**अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य**

**<u>प्रेस नोट</u>**

**दिनांक: १४ ऑक्टोबर २०२६**

**स्थळ:** मुंबई

**रक्तदान शिबिरात रक्तदात्यांना टायटन कंपनीची घड्याळे भेट म्हणून दिल्याप्रकरणी मुंबईतील तीन रक्तकेंद्रांवर अन्न व औषध प्रशासनाची कारवाई**

- रक्तदान शिबिरात रक्तदात्यांना टायटन घड्याळे भेट दिल्याचे तपासणीत निष्पन्न.
- राष्ट्रीय रक्त संक्रमण परिषद (NBTC) च्या मार्गदर्शक तत्त्वांचे व औषधे व सौंदर्य प्रसाधने नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी मे. इंडियन रेड क्रॉस सोसायटी रक्तकेंद्र, मुंबई, M/s. Dean Grant Medical College & Sir J. J. Group of Hospital Blood Centre, भायखळा, मुंबई व बी. वाय. एल. नायर चॅरिटेबल हॉस्पिटल रक्तकेंद्र, मुंबई सेंट्रल, मुंबई या तीन रक्तपेढ्यांवर कारवाई.
- औषधे व सौंदर्य प्रसाधने नियम, १९४५ मधील तरतुदींअन्वये संबंधित रक्तकेंद्रांचे परवाने निलंबित.

**मुंबई,दिनांक १४ ऑक्टोबर २०२६:** रक्तदान शिबिरामध्ये रक्तदात्यांना भेटवस्तू देण्यास प्रतिबंध असतानाही मुंबई येथे आयोजित रक्तदान शिबिरात रक्तदात्यांना टायटन कंपनीची घड्याळे भेट म्हणून दिल्याचे निदर्शनास आले. या प्रकरणी अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य यांच्यामार्फत मे. इंडियन रेड क्रॉस सोसायटी रक्तकेंद्र, मुंबई, M/s. Dean Grant Medical College & Sir J. J. Group of Hospital Blood Centre, भायखळा, मुंबई व बी. वाय. एल. नायर चॅरिटेबल हॉस्पिटल रक्तकेंद्र, मुंबई सेंट्रल, मुंबई रक्तपेढ्यांविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे.

यंग स्टार कमिटी, अल्टामाऊंट रोड, मुंबई यांनी एप्रिल २०२६ च्या सुमारास मुंबई येथे रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिराच्या जाहिरातीमध्ये रक्तदात्यांना टायटन घड्याळ भेट म्हणून देण्यात येणार असल्याचे नमूद करण्यात आले होते. राष्ट्रीय रक्त संक्रमण परिषद (NBTC) यांच्या Guidelines for Voluntary Blood Donation नुसार ऐच्छिक रक्तदान शिबिरात रक्तदात्यांना कोणतीही भेटवस्तू देणे प्रतिबंधित आहे.

प्रारंभी रक्तदान शिबिराच्या आयोजकांनी व सहभागी रक्तपेढ्यांनी भेटवस्तू वाटपाबाबत अनभिज्ञता दर्शविली होती. तथापि, तपासणीदरम्यान काही रक्तदात्यांशी संपर्क साधला असता, त्यांना घड्याळे भेट म्हणून मिळाल्याची पुष्टी झाली होती.

या प्रकरणी संबंधित रक्तपेढ्यांची दिनांक २२ ऑगस्ट २०२६ रोजी तपासणी करण्यात आली. आढळलेल्या त्रुटींबाबत दिनांक २ सप्टेंबर २०२६ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली. त्यानंतर दिनांक २२ सप्टेंबर २०२६ रोजी संबंधित रक्तपेढ्यांची वैयक्तिक सुनावणी घेण्यात आली. रक्तपेढ्यांनी सादर केलेले स्पष्टीकरण समाधानकारक नसल्याने औषधे व सौंदर्य प्रसाधने नियम, १९४५ मधील तरतुदींअन्वये पुढीलप्रमाणे परवाना निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.

इंडियन रेड क्रॉस सोसायटी रक्तकेंद्र, Dean Grant Medical College & Sir J. J. Group of Hospital Blood Centre, भायखळा व बी. वाय. एल. नायर चॅरिटेबल हॉस्पिटल रक्तकेंद्र, मुंबई या तीन रक्तकेंद्रांचे परवाने अनुक्रमे पाच दिवस, तीन दिवस व तीन दिवसांसाठी निलंबित करण्यात आले आहेत.

दरम्यान, डीन ग्रँट मेडिकल कॉलेज व सर जे. जे. समूह रुग्णालय रक्तकेंद्र तसेच बी. वाय. एल. नायर चॅरिटेबल हॉस्पिटल रक्तकेंद्रांनी निलंबन आदेशांविरुद्ध शासनाकडे अपील दाखल केले असून, त्यांना निलंबन आदेशांवर तात्पुरती स्थगिती प्राप्त झाली आहे.

"रक्तदान ही सामाजिक बांधिलकी आणि मानवतेच्या सेवेशी संबंधित महत्त्वाची प्रक्रिया आहे. रक्तदानासाठी कोणत्याही प्रकारच्या भेटवस्तू किंवा प्रलोभनांचा वापर होऊ नये, तसेच संबंधित मार्गदर्शक तत्त्वांचे पालन व्हावे, यासाठी अन्न व औषध प्रशासन कटिबद्ध आहे. रक्तपेढ्यांनी लागू असलेल्या कायदेशीर तरतुदी व मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोर पालन करावे."

**-तुकाराम मुंढे, आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य**

<u>तात्काळ व्यापक प्रसिद्धीसाठी</u>

**सह आयुक्त (औषधे), मुख्यालय**
**अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य**